



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : १५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२९ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# साखरेच्या साठेबाजांवर केंद्र सरकारची करडी नजर !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मुंबई :** साखरेची साठेबाजी आणि कृत्रिम टंचाईला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेल्या साठा निर्बंधांची राज्यात काटेकोर अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. साखर कारखाने, वितरक, व्यापारी; तसेच मोठ्या ग्राहकांकडील साठ्याची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी गुरुवारपासून राज्यभर विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.



केंद्र सरकारने २८ जुलै २०२६ रोजी प्रसृत केलेल्या अधिसूचनेनुसार हे निर्बंध एक ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या कालावधीत लागू राहणार आहेत. त्यानंतर १९ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे दरमहा उत्पादन, वापर किंवा कच्चा माल म्हणून १० टनांपेक्षा अधिक साखर वापरणाऱ्या मोठ्या ग्राहकांनाही साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे. अशा ग्राहकांना साखर प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांपेक्षा अधिक काळ तिचा साठा करता येणार नाही.

साखर विक्रेते, वितरक आणि संबंधित मोठ्या ग्राहकांना अन्नसाठा देखरेख पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यावर सध्याच्या साखर साठ्याची माहिती भरावी लागणार असून, त्यानंतर दर शुक्रवारी साठ्याची स्थिती अद्ययावत करावी लागणार आहे. साखरेच्या साठ्याची पडताळणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष तपासणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

जिल्हा पुरवठा अधिकारी या पथकाचे अध्यक्ष असतील. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था; साखर आयुक्त कार्यालयाचा संबंधित जिल्ह्यातील प्रतिनिधी; वैधमापनशास्त्र निरीक्षक आणि पोलिस अधीक्षक किंवा पोलिस निरीक्षक दर्जाचा अधिकारी हे पथकाचे सदस्य असतील. मुंबई आणि ठाणे परिमंडळासाठी नियंत्रक, शिधावाटप; तसेच संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या स्तरावर स्वतंत्र विशेष पथके स्थापन केली जाणार आहेत. याशिवाय राज्यस्तरीय दक्षता पथकांकडूनही साखरेच्या साठ्यांची तपासणी केली जाणार आहे.

तपासणी पथके व्यापारी आणि वितरकांच्या गोदामांना प्रत्यक्ष भेट देऊन साखरेच्या पोत्यांची मोजणी करणार आहेत. या वेळी प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याची साठा नोंदवही, खरेदी-विक्रीच्या नोंदी, खरेदी पावत्या, गेट पास, वाहतूक व पाठवणीची कागदपत्रे तसेच अन्नसाठा देखरेख पोर्टलवर जाहीर केलेल्या साठ्याशी पडताळणी केली जाणार आहे. साखर कारखान्यांकडून मोठ्या ग्राहकांना थेट किंवा पुरवठादारांमार्फत करण्यात आलेल्या मासिक साखर विक्रीचीही तपासणी केली जाणार आहे.

**तफावत आढळल्यास कारवाई!**

पोर्टलवर जाहीर केलेला साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास त्याची नोंद तपासणी अहवालात केली जाणार आहे. यासाठी साठ्याची छायाचित्रे, साठा नोंदवही आणि संबंधित कागदपत्रांसह आवश्यक पुरावे संकलित केले जातील. साठा निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. ही तपासणी व कारवाई ३० नोव्हेंबरपर्यंत किंवा त्यापूर्वी संबंधित परिपत्रकानुसार लागू राहणार आहे.

---

## खारघरमध्ये निवडणूक कागदपत्रांचा गंभीर प्रकार!

### ३,४०० गणनापत्रके खासगी झेरॉक्स दुकानात, पाच बीएलओंवर निलंबन





**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२८, खारघर (नवी मुंबई) :** निवडणूक प्रक्रियेशी संबंधित संवेदनशील गणनापत्रके खासगी झेरॉक्स सेंटरमध्ये आढळल्याचा गंभीर प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. सेक्टर १९ येथील एका झेरॉक्स दुकानात तब्बल ३,४०० गणनापत्रके झेरॉक्स करण्यासाठी आणण्यात आल्याचे तपासात समोर आले असून, या प्रकरणामुळे प्रशासकीय यंत्रणेत आणि लोकांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रकरणी सूरज पाटील यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, कर्तव्यात कसूर केल्याच्या आरोपावरून पाच बीएलओंना निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास खारघर सेक्टर १९ मधील एका खासगी झेरॉक्स दुकानात निवडणूक आयोगाशी संबंधित गणनापत्रकांच्या मोठ्या प्रमाणावर प्रती काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. त्यानंतर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात गणनापत्रके आढळून आली.

तपासात जप्त करण्यात आलेली कागदपत्रे खारघर परिसरातील ११ मतदान केंद्रांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच काही मतदान केंद्रांतील मोठ्या प्रमाणावरील गणनापत्रके अनधिकृत व्यक्तींकडे कशी पोहोचली, याबाबत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

या प्रकरणात संबंधित पाच बीएलओंनी शासकीय जबाबदारी पार पाडताना गंभीर निष्काळजीपणा केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने प्रशासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. त्यांच्याविरोधात विभागीय चौकशी आणि शिस्तभंगाची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात जाऊन तीव्र निषेध नोंदविला. निवडणूक प्रक्रियेशी निगडित महत्त्वाची कागदपत्रे खासगी व्यक्तींपर्यंत कशी पोहोचली, याचा शोध घेऊन या प्रकरणातील सर्व जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणी संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आणि प्रशासनाकडून पुढील तपास सुरू आहे. तपासातून या संवेदनशील कागदपत्रांच्या गैरहाताळणीमागील नेमके कारण आणि इतर कोणाची जबाबदारी समोर येते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मक्याच्या शेतात गांजाची शेती!

### थाळनेर पोलिसांची मोठी कारवाई...

**९३ लाख ५० हजारांचा ३७४ किलो गांजा जप्त**



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२८, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील थाळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अतिदुर्गम जमाईपाडा परिसरात मक्याच्या पिकात लपवून केलेली गांजाची शेती पोलिसांनी उद्ध्वस्त केली आहे. या धडक कारवाईत तब्बल ९३ लाख ५० हजार रुपये किमतीचा ३७४ किलो गांजा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

थाळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना या बेकायदेशीर शेतीबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे अतिदुर्गम जमाईपाडा परिसरातील वनविभागाच्या जमिनीवर छापा टाकण्यात आला. या ठिकाणी रविंद्र खुमसिंग पावरा रा. महादेव याने मक्याच्या पिकामध्ये मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गांजाची लागवड केली होती.

यावेळी पोलिसांची चाहूल लागताच आरोपी शेतातून पळून जाण्यात यशस्वी झाला. घटनास्थळावरून २५ हजार रुपये प्रति किलो या अंदाजित दराने एकूण ९३ लाख ५० हजार रुपये किमतीची ३७४ किलो वजनाची गांजा वनस्पती जप्त करण्यात आली आहेत.

या प्रकरणी थाळनेर पोलीस ठाण्यात रविंद्र पावरा याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (ल), २०(अ) (ळ), २८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे,उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक हर्षल पाटील, पोलीस अंमलदार चतरसिंग खसावद, उमाकांत वाघ, विजय पाटील, अनिकेत साळुंखे, विनोद पावरा, रविंद्र कोकणी, चालक आकाश साळुंखे, केशव जाधव, कैलास महाजन आणि स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार देवेंद्र ठाकूर, गुलाब पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

---

## बल्लारपूर पेपर मिलची जमीन ईएसआयसी रुग्णालयासाठी घेण्याच्या निर्णयाचा फेरविचार करा माजी खा. नरेश पुगलिया

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** जिल्ह्यातील ईएसआयसी रुग्णालयासाठी बल्लारपूर पेपर मिलच्या ताब्यातील स्थायी लिजवरील १९.२३ हेक्टर (सुमारे ४७.६ एकर) जमीन शासनजमा करुन रुग्णालयासाठी देण्याच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी बल्लारपूर पेपर मिल कामगार युनियनचे अध्यक्ष नरेश पुगलिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुंबई येथे झालेल्या बैठकीत बल्लारपूर पेपर मिलच्या ताब्यातील जमीन शासनाच्या ताब्यात घेऊन ती ईएसआयसी रुग्णालयासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे. चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा असल्याने ईएसआयसी रुग्णालयाची आवश्यकता असल्याचे मान्य करतानाच, हे जिल्हास्तरीय रुग्णालय असल्यामुळे ते चंद्रपूर शहरात किंवा बल्लारपूर परिसरातील अन्य उपलब्ध शासकीय जागेवर उभारणे अधिक योग्य ठरेल, असे पुगलिया यांनी निवेदनात म्हटले आहे.

बल्लारपूर पेपर मिल सन १९५२ पासून कार्यरत असून, या उद्योगात स्थायी, अस्थायी कामगार आणि अधिकारी मिळून सुमारे ४,५०० ते ५,००० कर्मचारी कार्यरत आहेत. दररोज सुमारे ७५० ते ८०० टन कागदांचे उत्पादन या उद्योगातून होते. स्थानिक रोजगार निर्मितीसह बल्लारपूरच्या औद्योगिक व आर्थिक विकासात या उद्योगाचे मोठे योगदान असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. उद्योगाचेया भविष्यातील विस्तारासाठी आणि उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी जागेची आवश्यकता असताना पेपर मिलच्या ताब्यातील जमीन कमी केल्यास त्याचा औद्योगिक विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे रुग्णालयासाठी पेपर मिलची



विद्यमान जमीन घेण्याऐवजी बल्लारपूर अथवा चंद्रपूर परिसरातील पर्यायी शासकीय जागांचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी पुगलिया यांनी केली आहे.

ईएसआयसी रुग्णालय बल्लारपूर किंवा चंद्रपूर येथे उभारावे, अशी मागणी आपण यापूर्वी २७ एप्रिल २०२३ रोजी तत्कालीन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे पत्राद्वारे केली होती, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आपण मागील ४४ वर्षांपासून बल्लारपूर पेपर मिलच्या कामगार युनियनचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, उद्योगाचा विस्तार, उत्पादन क्षमता वाढ आणि कामगारांचे हित यासाठी प्रयत्नशील असल्याचे पुगलिया यांनी म्हटले आहे. पेपर मिलची जमीन काढून घेतल्याने उद्योगाच्या भविष्यातील विस्तारावर परिणाम होण्याची आणि औद्योगिक वातावरण बिघडण्याची भीती कामगारांमध्ये निर्माण झाली आहे. ईएसआयसी रुग्णालयासाठी पर्यायी शासकीय जागा उपलब्ध करुन देऊन कामगारांना आरोग्य सुविधा आणि पेपर मिलला औद्योगिक विकासाची संधी, दोन्ही गोष्टी साध्य कराव्यात, अशी मागणी पुगलिया यांनी केली आहे. अन्यथा या निर्णयामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण होऊन बल्लारपूरचे औद्योगिक वातावरण दूषित होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## ठाणेकरांनो, सज्ज व्हा! उद्या ३२ वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन

**अक्षराज : विकास दळवी**




**दि.२८, ठाणे :** ठाण्याच्या क्रीडा परंपरेत मानाचे स्थान निर्माण करणारी ३२वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन २०२६ यंदाही ठाणे महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. वर्षानुवर्षे ठाणेकरांनी या मॅरेथॉनला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद ही या स्पर्धेची खास ओळख बनली आहे.

यंदाच्या मॅरेथॉनमध्ये आबालवृद्ध, युवक-युवती, क्रीडाप्रेमी तसेच ठाणेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आरोग्य, फिटनेस आणि क्रीडा संस्कृतीचा संदेश देत या गौरवशाली परंपरेचा भाग व्हावे, असे आवाहन सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्याकडून करण्यात आले आहे.

रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६ वाजता ठाणे महानगरपालिका मुख्यालय, पांचपाखाडी येथून या उत्साहपूर्ण क्रीडा पर्वाला सुरुवात होणार आहे.

धावण्याच्या या उत्सवातून ठाणेकरांचा उत्साह, क्रीडाप्रेम आणि एकजूट पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार आहे. शहराच्या रस्त्यांवर धावणाऱ्या हजारो नागरिकांच्या सहभागातून 'फिट ठाणे, निरोगी ठाणे' या भावनेलाही बळ मिळणार आहे.




## शिक्षणाच्या दारास नकोत कुलपे

ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरावा म्हणून दिवे लावायचे आणि ते हवेने विझू नयेत म्हणून त्यावर लगेच झाकण ठेवायचे या कृतीचे समर्थन कोण करेल? प्रकाशाच्या अपेक्षेने दिवा लावला जात असेल, तर तो विझू नये याची काळजी, तो लावण्यापूर्वीच घेणे जरूरीचे असते; अन्यथा लावून झाकलेल्या दिव्याचा प्रकाशही पडणार नाही आणि तो विझणारही नाही. नव्या प्रकाशासाठी नियमांचे दिवे लावण्याचा प्रयत्न आदिवासी विभागाने केला आणि त्यावरूनच ठिणगी पडली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सुसूत्रता यावी म्हणून त्यांनी नवी नियमावली आणली. त्याविरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. प्रारंभी काही अटी मागे घेतल्या. आंदोलन तीव्र झाल्यावर आणखी काही नियम मागे घेतले. नियम मागेच घ्यायचेच होते तर ते लागू का केले? कुणाच्या सल्ल्याने केले? त्यांना विरोध, आंदोलने होतील याचा अंदाज कुणालाच आला नसावा का?

या सगळ्या प्रकरणाची सुरुवात झाली ती, आदिवासी विभागाने ५ ऑगस्ट रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाने. तो सगळाच निर्णय वाईट आहे, असे नाही. त्यातील काही अटी चांगल्या आहेत, काहींवर आक्षेप आहे. २६ वर्षांवरील विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश नसेल, ज्याच्या शिक्षणात खंड पडला त्याला प्रवेश नसेल, एक पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या पदवीसाठी शिक्षण घ्यायचे झाल्यास वसतिगृह मिळणार नाही. खोटी माहिती देणाऱ्याचे प्रवेश रद्द होतील. त्यांनी घेतलेल्या लाभाची रक्कम १२ टक्के व्याजदराने वसूल केली जाईल. या अटींना विरोध सुरू झाला. विद्यार्थ्यांना संघटनेत भाग घेता येणार नाही, अन्नत्याग, आंदोलन करता येणार नाही. संपासाठी प्रवृत्त करता येणार नाही. प्रसारमाध्यमांकडे तक्रारी करता येणार नाही अशा निर्बंधांनी त्यात तेल ओतले. त्यांनी गिरीपेठ परिसरातील आदिवासी भवनापुढे 'अहोरात्र आंदोलन' सुरू केले. हळूहळू ते सगळीकडे पसरले. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आंदोलनास भेटी दिल्या. मंत्री भेटले. १४ ऑगस्टला काही अटी मागे घेतल्या गेल्या. राज्यातील आदिवासी आमदारांच्या बैठकीनंतर आणखी काही अटी मागे घेण्याची चर्चा सुरू झाली.

ज्यांना समाजातील विषमता, गरिबी आणि दुर्गमतेमुळे अनेक अडथळे पार करावे लागतात, त्यांना, '२६ वर्षांनंतर शिक्षण नको', 'शिक्षणात खंड नको ', 'आवाज उठवला तर वसतिगृह धोक्यात' असा संदेश देणे कितपत न्यायाचे समजावे? आदिवासी विद्यार्थ्यांचे आयुष्य शहरातील विद्यार्थ्यांसारखे सरळ रेषेत चालत नाही.असंख्य समस्यांचा विळखा त्यांच्या भोवती पडलेला असू शकतो. यातील कोणतेही कारण त्यांच्या शिक्षणात खंड पाडू शकते. या खंडाने त्यांचे शैक्षणिक आयुष्य खंडित होऊ नये. नियमावलीतील सगळ्याच अटी आक्षेपार्ह नाहीत. वसतिगृहात नशापाणी नको, मद्यपान-धूम्रपान नको, मारामाऱ्या नको, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांची यादी असावी आदींचाही त्यात समावेश आहे. त्याला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. काही क्षेत्रात शिस्त असणे आवश्यक असते.

शासन निर्णय म्हणजे पांढऱ्या कागदावरील काळी अक्षरे नव्हेत. त्याच्या प्रत्येक ओळीतील प्रत्येक शब्द हजारो लोकांचे आयुष्य घडवू किंवा बिघडवू शकतो. सध्या राज्यात ४९० शासकीय आदिवासी वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यात सुमारे ६० हजार विद्यार्थी शिकतात. नियमावलीतील चुकीचे शब्द त्यांच्या शैक्षणिक आयुष्यासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे लिहितानाच हजार वेळा विचार करावा.

उन्हाळ्यातील गोष्ट. नागपुरात ४६ अंश सेल्सिअस तापमानात होते. वसतिगृहात कूलर नव्हते. विद्यार्थ्यांच्या एका फोनवर मुख्यमंत्र्यांनी तासाभरात कूलर लावण्याचे आदेश दिले. मुख्यमंत्र्यांची ही संवेदनशीलता प्रशासन आत्मसात करील तेव्हा नियमावलींची आणि आंदोलनाची कशाला गरज भासेल!

**– अतुल पांडे**

# राखीच्या धाग्यापलीकडचे बहिण-भावाचे नाते

रक्षाबंधन हा बहिण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. यंदा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होत आहे. या दिवसाकडे धार्मिक परंपरा किंवा कर्मकांडाच्या चौकटीतून न पाहता, मानवी नात्यांच्या भावविश्वातून पाहिले तर त्याचे महत्त्व अधिक व्यापकपणे जाणवते. बहिण आणि भाऊ हे नाते जन्मतः मिळते; परंतु त्यातील प्रेम, विश्वास आणि आपलेपणा आयुष्यभर जपावा लागतो. बालपणीच्या निरागस आठवणींपासून ते प्रौढ आयुष्यातील जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते अनेक अनुभवांतून समृद्ध होत जाते. कधी त्यात खोडकरपणा असतो, कधी भांडणे असतात, कधी रुसवे-फुगवे असतात, तर कधी कोणत्याही शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेणारी विलक्षण जवळीक असते. म्हणूनच बहिण-भावाचे नाते हे केवळ रक्तसंबंध नसून भावनिक सोबतीचे आणि आयुष्यभर टिकणाऱ्या विश्वासाचे नाते आहे.

बहिण-भावाच्या नात्याची सुरुवात बहुतेकदा बालपणाच्या अंगणात होते. एकाच घरात वाढताना दोघांच्या आयुष्यातील असंख्य क्षण एकमेकांशी जोडलेले असतात. खेळताना झालेले भांडण, खाऊसाठी केलेली धावपळ, शाळेत जाण्याची लगबग, गृहपाठ टाळण्यासाठी केलेली कारणे, पालकांकडून मिळालेली कौतुकाची थाप आणि कधी झालेली रागाची बोलणी या सर्व आठवणी भावंडांच्या मनात साठत जातात. बालपणी एखादी छोटीशी वस्तू मिळाली नाही म्हणून झालेले भांडण त्या क्षणी मोठे वाटते; परंतु काही वेळाने तेच दोघे पुन्हा एकत्र खेळू लागतात. या छोट्या घटनांमधून नात्याचा एक महत्त्वाचा गुण दिसून येतो. मनात राग असला तरी मनात दुरावा कायम राहत नाही. बालपणातील हे सहज प्रेम पुढे आयुष्याच्या अनेक वळणांवर भावंडांना एकमेकांशी जोडून ठेवते.

बहिण-भावाच्या नात्यातील सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे त्यातील सहजता. या नात्यात स्वतःला वेगळे दाखवण्याची गरज नसते. आपली चूक, आपला राग, आपले दुःख, आपला आनंद किंवा आपली चिंता मनमोकळेपणाने व्यक्त करता येते. बाहेरच्या जगात प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिमा जपावी लागते; परंतु भावंडांसमोर ती प्रतिमा बाजूला ठेवून मनातील खरी भावना व्यक्त करता येते. बहीण भावाला त्याच्या चुका थेट सांगू शकते आणि भाऊही बहिणीला तिच्या निर्णयांबद्दल प्रामाणिक सल्ला देऊ शकतो. या मोकळेपणामुळे नाते अधिक घट्ट होते. अनेकदा आयुष्यातील एखाद्या कठीण प्रसंगी मित्रांपेक्षा आधी आठवण येते ती भावंडांची. कारण या नात्यात मदतीपूर्वीच विश्वास असतो.

बालपण मागे पडले की भावंडांच्या आयुष्यात बदल सुरू होतात. शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाणे, नोकरीसाठी शहर बदलणे, विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब निर्माण करणे किंवा परदेशात स्थायिक होणे



यामुळे एकत्र राहण्याचे दिवस संपतात. पूर्वी दररोज होणारा संवाद आता आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा होऊ शकतो. एकाच घरात वाढलेली भावंडे कधी कधी हजारो किलोमीटर अंतरावर राहू लागतात. मात्र भौगोलिक अंतर वाढले म्हणून भावनिक अंतर वाढायलाच हवे असे नाही. उलट, दूर गेल्यावर एकमेकांची आठवण अधिक तीव्र होते. बालपणीच्या आठवणी, कुटुंबातील प्रसंग आणि एकत्र घालवलेला काळ या आठवणी भावंडांना मनाने जोडून ठेवतात.

आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाच्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्यांच्या व्यापात अडकलेली आहे. अशा परिस्थितीत नाती जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ देणे आवश्यक झाले आहे. बहिण-भावाच्या नात्यासाठी महागड्या भेटवस्तूंची गरज नाही. कधी अचानक केलेला दूरध्वनी, मनापासून विचारलेली विचारपूस, एखादा जुना प्रसंग आठवून केलेली गंमत किंवा संकटाच्या वेळी दिलेला धीर हे अधिक मौल्यवान असते. 'तू कसा आहेस?' किंवा 'तुला काही मदत हवी आहे का?' एवढे साधे शब्दही नात्याला आधार देतात. नात्याची किंमत भेटवस्तूच्या किमतीने ठरत नाही; ती एकमेकांना दिलेल्या वेळेने, समजून घेण्याच्या वृत्तीने आणि कठीण प्रसंगी दिलेल्या साथीने ठरते.

बहिण-भावाचे नाते आजच्या काळात समानतेच्या नव्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. पूर्वी भावाची भूमिका केवळ बहिणीचे संरक्षण करणारा अशी मांडली जात असे. आज मात्र या नात्याचा अर्थ त्यापेक्षा व्यापक झाला आहे. बहीणही भावाच्या आयुष्यात तितकीच आधार देणारी व्यक्ती असते. भावाला अडचण आली तर बहीण त्याच्या पाठीशी उभी राहते आणि बहिणीसमोर संकट आले तर भाऊ तिच्यासोबत राहतो. ही साथ एकतर्फी नसून परस्परांची असली पाहिजे. प्रेमामध्ये अधिकार असू शकतो; परंतु नियंत्रण नसावे. काळजी असावी; परंतु बंधने नसावीत. सल्ला असावा; परंतु निर्णय लादण्याची वृत्ती नसावी. या समतोलातूनच आधुनिक बहिण-भावाचे नाते अधिक परिपक्व होऊ शकते.

विशेषतः बहिणीच्या शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या वाटचालीत भावाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. बहिणीने काय शिकावे, कोणते काम करावे, कुठे राहावे किंवा कोणते निर्णय घ्यावेत यावर अधिकार गाजवण्याऐवजी तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे ही खरी साथ आहे. तिच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशासारखा मानणे आणि तिच्या अपयशाच्या वेळी तिला खंबीरपणे उभे करणे हे भावाच्या प्रेमाचे अधिक सुंदर रूप आहे. त्याचप्रमाणे भावाच्या आयुष्यातील संघर्ष, आर्थिक अडचणी, करिअरमधील चढ-उतार किंवा भावनिक ताण समजून घेऊन त्याला दोष न देता ऐकून घेणे ही बहिणीचीही महत्त्वाची भूमिका आहे. दोघांनीही एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले पाहिजे.

बहिण-भावाच्या नात्यात संवादाला विशेष महत्त्व आहे. अनेक गैरसमज संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. 'तो स्वतःहून समजून घेईल' किंवा 'ती माझ्या मनातील भावना ओळखेल' असे गृहीत धरल्याने कधी कधी मनात अंतर वाढते. त्याऐवजी आपल्याला काय वाटते हे स्पष्टपणे सांगणे, समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि मतभेद झाले तरी नाते तोडण्याऐवजी संवाद कायम ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक भावंडाची जीवनशैली, विचारसरणी आणि निर्णय घेण्याची पद्धत वेगळी असू शकते. मतभिन्नता म्हणजे नात्यातील तुटलेपणा नव्हे. परस्परांच्या वेगळेपणाचा स्वीकार करणे हेच प्रगल्भ नात्याचे लक्षण आहे.

विवाहानंतर बहिणीचे आयुष्य अनेक बाबतींत बदलते. ती नव्या कुटुंबात प्रवेश करते, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारते आणि अनेकदा वेगळ्या शहरात राहू लागते. अशा वेळी माहेरच्या भावंडांशी असलेले नाते तिच्यासाठी भावनिक आधार ठरू शकते. मात्र हा आधार तिच्या वैयक्तिक आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणारा नसावा. बहिणीच्या जीवनातील निर्णयांचा सन्मान करणे आणि तिच्या गरजेच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे विवाहित बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील बदल समजून घेत त्याच्या जबाबदाऱ्यांचा आदर केला पाहिजे. नात्यातील जवळीक टिकवायची असेल तर अधिकारापेक्षा समजूतदारपणाला महत्त्व द्यावे लागते.

भावंडांच्या नात्यात कधी आर्थिक मदतीची गरजही निर्माण होते. एखाद्या भावंडाला शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य जीवनप्रसंगी मदत लागते. अशा वेळी शक्य असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे ही नात्याची ताकद आहे. मात्र आर्थिक व्यवहारांमुळे प्रेमाचे मोजमाप होऊ नये. कोणाने किती खर्च केला, कोणाने किती भेट दिली किंवा कोणाने किती मदत केली याची हिशेबपत्रिका नात्यात ठेवली तर भावनिक जवळीक कमी होऊ शकते. नात्याची श्रीमंती पैशांत नसते; ती विश्वासात असते. संकटाच्या वेळी 'तू एकटा नाहीस' किंवा 'तू एकटी नाहीस' हा दिलासा अनेकदा कोणत्याही आर्थिक मदतीपेक्षा मोठा आधार ठरतो.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावंडांनी आपल्या नात्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. वर्षभर व्यस्त राहिल्यानंतर या दिवशी भेटणे हा एक सुंदर योग असतो; परंतु त्यापलीकडे या दिवसाचा अर्थ अधिक मोठा आहे. एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, झालेल्या गैरसमजांवर पडदा टाकणे आणि भविष्यातील आयुष्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देणे हे या दिवसाचे खरे सौंदर्य ठरू शकते. राखी हा केवळ मनगटावर बांधला जाणारा धागा नसून भावनिक नात्याची आठवण करून देणारे प्रतीक आहे. त्या धाग्याला अर्थ प्राप्त होतो तो परस्परांच्या मनात असलेल्या प्रेमामुळे.

आज डिजिटल माध्यमांमुळे दूर असलेल्या भावंडांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्हिडिओ संभाषण, संदेश आणि दूरध्वनी यामुळे अंतर काही प्रमाणात कमी करता येते. परंतु तंत्रज्ञान हे नात्याचा पर्याय नाही; ते नाते जपण्याचे साधन आहे. सामाजिक माध्यमांवर एकमेकांसोबतचे छायाचित्र प्रसिद्ध करणे किंवा शुभेच्छा देणे सुंदर आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष आयुष्यात एकमेकांसाठी उपलब्ध असणे. एखाद्या भावंडाच्या यशावेळी मनापासून आनंद व्यक्त करणे आणि अपयशाच्या वेळी त्याला कमी लेखण्याऐवजी धीर देणे यामुळे नाते अधिक अर्थपूर्ण होते. सार्वजनिक प्रदर्शनापेक्षा खासगी आपुलकी अधिक मौल्यवान असते.

बहिण-भावाच्या नात्यातील आठवणी हा एक वेगळाच भावनिक ठेवा असतो. घरातील जुन्या वस्तू, शाळेची छायाचित्रे, बालपणीचे खेळ, एकत्र केलेल्या सहली, पालकांनी दिलेल्या सूचना, छोट्या कारणांवरून झालेले वाद आणि नंतर झालेली मैत्री या सर्व गोष्टी काळ पुढे गेल्यानंतर अमूल्य वाटू लागतात. बालपणी ज्यांच्यासोबत वेळ घालवणे अगदी स्वाभाविक वाटत होते, त्याच क्षणांची पुढे आठवण येते. म्हणूनच भावंडांनी केवळ जुन्या आठवणी जपण्यापेक्षा नव्या आठवणीही निर्माण कराव्यात. एकत्र वेळ घालवणे, कुटुंबीयांसोबत भेटणे आणि परस्परांच्या आयुष्यात सहभागी राहणे यामुळे नाते सतत नव्याने फुलत राहते.

या नात्यात क्षमाशीलतेचे महत्त्वही मोठे आहे. भावंडे जवळची असल्यामुळे एकमेकांकडून अपेक्षाही मोठ्या असतात. त्यामुळे कधी शब्द लागतात, गैरसमज होतात किंवा मन दुखावले जाते. परंतु प्रत्येक मतभेदाला कायमचा दुरावा बनू देणे योग्य नाही. नाते टिकवण्यासाठी कधी स्वतःची चूक मान्य करावी लागते, कधी माफी मागावी लागते आणि कधी समोरच्याला माफ करावे लागते. 'मीच बरोबर' या भूमिकेपेक्षा 'आपले नाते महत्त्वाचे आहे' ही भावना अधिक मोठी असली पाहिजे. नात्यातील प्रेम टिकवण्यासाठी अहंकाराला थोडे मागे ठेवावे लागते.

बहिण-भावाचे नाते आपल्याला माणूस म्हणून अधिक संवेदनशील बनवते. दुसऱ्याची काळजी घेणे, त्याच्या भावनांचा आदर करणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि संकटात त्याला आधार देणे या मूल्यांची सुरुवात अनेकदा कुटुंबातील नात्यांपासूनच होते. म्हणूनच या नात्यातील प्रेम केवळ दोन व्यक्तींमध्ये मर्यादित राहत नाही; ते संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर परिणाम करते. परस्पर सन्मान आणि समानतेवर आधारलेली भावंडे पुढे समाजातील इतर नात्यांकडेही अधिक संवेदनशीलतेने पाहू शकतात. त्यामुळे बहिण-भावाचे नाते हे केवळ वैयक्तिक नाते नसून मानवी मूल्यांची शाळाही आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधावी, भावाने बहिणीला प्रेमाने भेट द्यावी, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात; परंतु या बाह्य कृतींपेक्षा त्या मागील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. बहिणीच्या स्वप्नांना बळ देणे, भावाच्या संघर्षांना समजून घेणे, एकमेकांच्या निर्णयांचा आदर करणे, मतभेदांमध्ये संवाद साधणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे साथ देणे हा या नात्याचा खरा उत्सव आहे. नात्याचे सौंदर्य एका दिवसापुरते मर्यादित नसते. रक्षाबंधनाचा दिवस त्या नात्याची जाणीव अधिक तीव्र करून देतो; मात्र त्यातील प्रेम वर्षभर जगले गेले पाहिजे.

आजच्या काळात नात्यांमध्ये वाढणारा ताण, धावपळ आणि वैयक्तिक आयुष्याभोवती केंद्रित होत जाणारी जीवनशैली पाहता बहिण-भावाच्या नात्याची जपणूक अधिक आवश्यक आहे. भावंडे एकमेकांची स्पर्धक नसून सहप्रवासी असतात. एका भावंडाचे यश दुसऱ्याच्या अपयशाचे कारण नसते. उलट, एकमेकांच्या प्रगतीत आनंद मानणे आणि परस्परांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही नात्याची खरी उंची आहे. तुलना, मत्सर आणि अहंकार यांना दूर ठेवून सहकार्य आणि आपुलकी स्वीकारली तर भावंडांचे नाते अधिक आनंददायी बनते.

शेवटी, बहिण-भावाचे नाते हे आयुष्याच्या प्रवासातील एक अनमोल सोबत आहे. बालपणी एकाच घराच्या छताखाली सुरू झालेला हा प्रवास पुढे वेगवेगळ्या दिशांनी जाऊ शकतो; परंतु मनातील आपलेपणाचा धागा तुटण्याची गरज नाही. काळ बदलतो, माणसे बदलतात, परिस्थिती बदलते आणि जबाबदाऱ्या वाढतात; तरीही बालपणीचा भाऊ आणि बालपणीची बहीण मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहतात. म्हणूनच २८ ऑगस्टच्या रक्षाबंधनानिमित्त राखीच्या धाग्यापेक्षा त्या धाग्याशी जोडलेले प्रेम अधिक महत्त्वाचे मानू या. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा सन्मान, स्वप्नांना प्रोत्साहन, सुख-दुःखात साथ, मनमोकळा संवाद आणि आयुष्यभराचा विश्वास या मूल्यांनी बहिण-भावाचे नाते अधिक समृद्ध करू या. कारण शेवटी राखी मनगटावर बांधली जाते; पण तिचा खरा धागा मनामध्ये जुळलेला असतो. तो धागा प्रेमाचा, आठवणींचा आणि विश्वासाचा असतो आणि म्हणूनच तो काळाच्या कोणत्याही अंतरापेक्षा अधिक मजबूत असतो.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## पोटगी

घटस्फोटीत नारी
पोटगीचा आधार
कायदा कृपा छत्र
सांभाळते घरदार

उदर निर्वाहासाठी
जरुरअसे हकदार
धोरणे लवचिकता
न्यायालयेही उदार

कायद्याचेगैरवापर
वाढूलागले प्रकार
अ वास्तव मागणी
जडूपाहतो विकार

वाकवावे पुरूषांना
जणूं चाले व्यापार
आर्थिकसक्षम जरी
मागतात धनअपार

चैनछोकी करायला
पोटगी द्याअपरंपार
अस्त्राचे गैरउपयोग
बुमरँग झाले हत्यार

एककल्ली स्त्रिवाद
मातू नये अ विचार
आत्मनिर्भरनारीला
नको वाटे अनाचार

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# नेपाळची दुर्घटना,भारताला सावधानतेचा इशारा!

हिमनदीचा भाग कोसळल्यामुळे नेपाळ-तिबेटमध्ये भीषण पूर आला असावा, असं प्राथमिक तपासात दिसून येतं असलं तरी हिमालयातील वेगानं वितळणाऱ्या बर्फाचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला आहे. या भीषण पुरामुळे २८८ भारतीयांसह १५०० बेपत्ता आहेत.

तर ३५९ मृतदेह सापडल्याचे वृत्त आहे. अतिशय विनाशकारी घटना घडली आहे महापूर म्हंटला की अतिवृष्टी, ढगफुटी, धरण फुटले असेल अथवा अनेक दिवसांच्या मुसळधार पावसाने नदीला महापूर आला असेल असे आपण मानतो. मात्र नेपाळ मधील या घटनेने सर्वच अंदाजाना छेद दिला आहे. नेपाळमधील जलविज्ञान आणि हवामान विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार रसुवा परिसरात दुर्घटनेच्या आधी मोठा पाऊस झालेला नव्हता. तरीही भोटेकोशी नदीत अचानक प्रचंड पाणी, गाळ, खडक आणि अवशेषांचा लोंढा आला हा प्रवाह पुढे त्रिशूली नदीत शिरला याची तीव्रता अतिशय विलक्षण होती.

आंतरराष्ट्रीय एकात्मिक पर्वतीय विकास केंद्राच्या प्राथमिक निरीक्षणानुसार त्रिशूली नदीतील गल्छी येथे पाण्याची पातळी अवघ्या ३० मिनिटात सुमारे ९ मीटरने तर त्याच कालावधीत मलेखू येथे ७ मिटरने वाढल्याचे समोर आले. नेपाळची दुर्घटना याच कारणामुळे भारतासाठीही महत्त्वाची आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशातील संवेदनशील भागामध्ये दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. उपग्रह माहिती, नदीपातळी, हिमनदी निरीक्षण, भूकंपीय संकेत आणि संभाव्य नैसर्गिक अडथळ्यांची माहिती शक्य तितक्या वेगाने शेजारी देशापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे नेपाळच्या दुर्घटनेने हा सर्वात मोठा धोरणात्मक धडा आहे. बर्फ, खडक, पाणी, तापमान आणि सातत्याने बदलणारे पर्वतीय उतार यांची परस्परक्रिया समजून घेणारी आपत्ती यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# विनोद शिरसाठ यांच्याकडून सामाजिक बांधिलकी; स्वखर्चातून अंगणवाडीचे केले नूतनीकरण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.,२८, विंचूर (नाशिक)** : गावाच्या सर्वांगीण विकासात आपलेही योगदान असावे आणि लहान चिमुकल्यांना शिक्षणासाठी दर्जेदार सुविधा मिळाव्यात, या उदात्त हेतूने विंचूर येथील प्रतिष्ठित व्यापारी विनोद भाऊ शिरसाठ यांनी एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शेजारील अंगणवाडीचे संपूर्ण नूतनीकरण त्यांनी स्वखर्चातून पूर्ण केले असून, या नूतनीकृत वास्तूचा लोकार्पण सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उद्घाटनप्रसंगी लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते, पाटील मॅडम, खांदवे मॅडम, कैलास सोनवणे, गंगा नाना गोरे तसेच विंचूरचे ग्रामविकास अधिकारी मगर यांनी आपले मनोगत व्यक्त करत विनोद शिरसाठ यांच्या या सामाजिक उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

दरम्यान, अंगणवाडीतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भौतिक सुविधा अधिक बळकट करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते, सरपंच सचिन दरेकर, कैलास सोनवणे व ग्रामसेवक मगर यांनी अंगणवाडी करता विशेष योगदान देण्याचे जाहीर केले.

अंगणवाडी ही ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची आणि संस्कारांची पहिली पायरी असते. या चिमुकल्यांना प्रसन्न, स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक वर्ग तसेच समस्त विंचूर ग्रामस्थांच्या वतीने विनोद शिरसाठ यांचे आभार मानून कौतुक करण्यात आले.

# श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालय भेकराईनगर, फुरसुंगी, येथे सायबर जनजागृती अभियान उत्साहात संपन्न




**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२७, हडपसर (पुणे)** : क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालय भेकराईनगर येथे सायबर जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

या सत्रामध्ये अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स पल्लवी दरेकर आणि श्रेया शिंदे यांनी सर्वांना ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील दीक्षित, उपमुख्याध्यापक मेमाणे सर, पर्यवेक्षक श्री सुधीर खोमणे व स्टेकहोल्डर माणिक गारकर तलाठी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात सर्व बँक स्टाफ मेंबर यांना डिजिटल सुरक्षेचे महत्त्व सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्यात आले.

यावेळी प्रत्यक्ष उदाहरणे, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले तसेच सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे समाधान करून घेतले.

यावेळी विद्यालयाच्या संस्थेच्या सर्व विश्वस्तांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांनी सर्वांना सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आणि अशा जनजागृती उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी तसेच प्रा. मनिषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर वॉरियर्सनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. अध्यक्ष व कर्मचाऱ्यांनी सायबर वॉरियर्सच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राजस्थान मधील शासकीय अधिकाऱ्यांकडून नमुंमपा इटीसी केंद्राला भेट देत दिव्यांग कल्याणकारी कामाची प्रशंसा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, नवी मुंबई** : महानगरपालिकेचे इटीसी दिव्यांग शिक्षण प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र हे एकाच छताखाली विविध प्रकारच्या दिव्यांगांना सेवासुविधा पुरविणारे केंद्र म्हणून सुपरिचित आहे. त्यामुळे याठिकाणी देशापरदेशातील नामांकित व्यक्ती तसेच अभ्यासक भेट देत असतात.

अशाचप्रकारे दिव्यांगांसाठी करण्यात येणाऱ्या कामांची माहिती घेण्यासाठी सनदी अधिकारी राजस्थान शासनाच्या राज्य प्रकल्प संचालक डॉ.रश्मी शर्मा यांनी सहा.संचालक डॉ.अनिल थानवी व आर्टिफिशिअल लिम्ब्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया चे उपव्यवस्थापक के. डी गोटे यांच्यासह भेट दिली. इटीसी केंद्राच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांची त्यांनी सविस्तर माहिती घेतली.

यावेळी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिलारे यांनी उपस्थित राहत मान्यवरांना केंद्रामधील दिव्यांग मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण, उपचार पद्धती तसेच केंद्राचे कामकाज व कार्यपद्धती या विषयी सविस्तर माहिती दिली.

डॉ. रश्मी शर्मा यांनी या पाहणीमध्ये केंद्रामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत प्रशंसा केली तसेच इटीसी केंद्राच्या धर्तीवर दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना सर्वत्र राबविणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी या भेटीबाबत समाधान व्यक्त केले. या भेटीचे सर्व नियोजन व नियंत्रण केंद्राच्या अधिक्षक व शैक्षणिक व्यवस्थापक यांनी केले.

# आ. वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली महागाईविरोधात सावलीत काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, सावली (चंद्रपूर)** : महागाई, बेरोजगारी, पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती, रासायनिक खतांचे वाढलेले दर, शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्या वतीने सावली येथे जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. विधिमंडळ पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चाला भरपावसातही हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भुजाडे पेट्रोल पंप येथून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत मोर्चा तहसील कार्यालय सावली येथे पोहोचला. बैलगाडीवरून काढण्यात आलेला मोर्चा विशेष आकर्षण ठरला. काँग्रेस कार्यकर्ते, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला आक्रोश व्यक्त केला.

यावेळी आ. विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. महागाई आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे त्यांनी सांगितले. ना खाऊंगा, ना खाने दूंगा म्हणणाऱ्यांनीच देश लुटला, असा घणाघाती आरोपही त्यांनी केला. मोर्चानंतर शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



**वन्यप्राण्यांच्या बंदोबस्ताची मागणी...**

सावली तालुक्यात वाघ व इतर हिंसक वन्यप्राण्यांचा वाढता वावर लक्षात घेता नागरिक व शेतकऱ्यांच्या जीविताची सुरक्षा करावी, वन्यप्राण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. मंदिरातील दान चोरी करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

याशिवाय मागील आठ महिन्यांपासून रखडलेल्या मनरेगा अंतर्गत व्हीबी-जी-आरएएम-जी योजनेच्या मंजुरी तात्काळ देण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर जोर**

निवेदनात सन २०२५-२६ मधील धान उत्पादक शेतकऱ्यांना धानाचा बोनस तात्काळ देण्यात यावा, २०१७ पूर्वी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचा कर्जमाफीच्या यादीत समावेश करावा, पात्र चालू कर्जदार शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, स्मार्ट मीटरची सक्ती बंद करून बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर काढावेत, अशा मागण्या करण्यात आल्या. उन्हाळी धान पिकासाठी गोसेखुर्द प्रकल्पाचे पाणी बारमाही उपलब्ध करून द्यावे, शेतपांदण रस्त्यांची कामे सुरू करावीत, कृषी पंपांसाठी सोलरची सक्ती बंद करून पूर्वीप्रमाणे विद्युत कनेक्शन उपलब्ध करून द्यावे, रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वाढलेल्या किमती कमी कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

ओबीसी, एससी व एसटी प्रवर्गातील पात्र उमेदवारांना आरक्षणाच्या हक्कासोबत नियमानुसार खुल्या प्रवर्गातील संधींचाही लाभ मिळावा, २०२६-२७ च्या जनगणनेत ओबीसी साठी स्वतंत्र कॉलम ठेवावा आणि ओबीसी विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणे शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

श्रावणबाळ सेवा योजना व संजय गांधी निराधार योजनेचे मागील सहा महिन्यांपासून थकीत मानधन तात्काळ देण्यात यावे, बंद असलेले ऑनलाइन पोर्टल सुरू करावे, रखडलेले घरकुल अनुदान वितरित करावे तसेच घरकुल लाभार्थ्यांना नियमानुसार पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. 'लाडकी बहीण' योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे बंद झालेले अनुदान पुन्हा सुरू करावे आणि पात्र नवीन लाभार्थ्यांचा समावेश करावा, अशी मागणीही करण्यात आली. जल जीवन मिशनसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या वीज बिल व देखभालीसाठी ग्रामपंचायतींना निधी देणे आणि ग्रामपंचायत प्रशासकांना नियमानुसार आवश्यक आर्थिक अधिकार देण्याची मागणी करण्यात आली.

या मोर्चामध्ये काँग्रेस नेते दिनेश चिटनुरवार, तालुका अध्यक्ष नितीन गोहणे, शहराध्यक्ष कृष्णा राऊत, महिला काँग्रेस अध्यक्ष उषा भोयर, शहराध्यक्ष भारती चौधरी, नगराध्यक्ष साधना वाढई, माजी नगराध्यक्ष लता लाकडे, विजय कोरेवार, राकेश गड्डमवार, कृउबा सभापती राजू ठाकरे, किशोर कारडे, नगरसेवक विजय मुत्यालवार, प्रफुल वाळके, प्रीतम गेडाम, सचिन संगिडवार, नितेश रस्से, गुणवंत सुरमवार, नगरसेविका पल्लवी ताटकोंडावार, नरेश सुरमवार, विलास यासलवार, निखिल सुरमवार, युवा शहर अध्यक्ष अंकुश शेंडे यांच्यासह तालुका, शहर, महिला व युवक काँग्रेसचे पदाधिकारी, नगरपंचायत पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते, शेतकरी, युवक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई मनपा शालेय विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना राखी बांधून साजरे केले रक्षाबंधन

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२८, मुंबई** : रक्षाबंधन हा बंधुभाव, प्रेम व संरक्षणाची भावना व्यक्त करणारा महत्त्वपूर्ण सण मानला जात. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या सीमेवर कार्यरत असलेले भारतीय जवान तसेच समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी बांधव यांच्या प्रति कृतज्ञता, आदर व देशसेवेची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने राखी व कृतज्ञता पत्र हा उपक्रम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या न्यू भायखळा एमपीएस इंग्रजी शाळेत नुकताच राबविण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये भायखळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल सांगळे व त्यांचे इतर २५ पोलीस सहकारी तसेच डी विभागाच्या विभाग निरीक्षिका सोफिया मॅडम यांना कार्यक्रमासाठी न्यू भायखळा एम पी एस इंग्रजी शाळेमध्ये आमंत्रित केले होते.



शाळेतील कार्यानुभव शिक्षक मुकुंद चेंडगे यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या राख्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना बांधण्यात आल्या आणि त्यांना कृतज्ञता पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल सांगळे म्हणाले की आम्ही सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी शालेय विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संरक्षणासाठी कायम कटिबद्ध आहोत. कार्यक्रमातूनच बाल मनामध्ये एकात्मतेची, आपुलकीची भावना निर्माण होते. असा सुंदर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व शाळा प्रशासनाचे आभार मानले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रशि.शिक्षक शंकर खेताडे यांच्या प्रस्तावनेने झाली. तर रिदा सिद्दिकी, लावण्या गुप्ता, सानिदी सकपाळ, क्रिया पवार आणि पिहू सिंग या विद्यार्थ्यांनी यावेळी आपले मनोगत आणि अंत:करणातील भावना सर्व पोलीस अधिकाऱ्यांसमोर व्यक्त केल्या.

या कार्यक्रमासाठी न्यू भायखळा शाळेच्या इन्चार्ज शिक्षिका प्रियंका भांडारकर तसेच लीना भांगरे, अश्विनी घोसाळकर तसेच हस्तकला शिक्षक मुकुंद चेंडगे, मुकेश भगत, प्रतापसिंग पाटील, दीपक राऊत आणि भूषण हजारे या सर्व शिक्षकांनी खूप मेहनत घेतली.

# घरफोडीतील आरोपी जेरबंद; पंढरपूर पोलिसांकडून १७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, पंढरपूर** : पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने चोरणाऱ्या आरोपीला पंढरपूर शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने जेरबंद केले आहे. आरोपीकडून चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १७ लाख १ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४४०/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(९) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने चोरीस गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. सदर गुन्हा हा दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी घडला होता. यापूर्वीही आरोपीने घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरल्याची माहिती तपासात समोर आली. तपासादरम्यान पोलिसांना काही पुरावे तसेच गोपनीय बातमीदारांकडून आरोपीबाबत महत्त्वाची माहिती मिळाली.




चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढगे यांच्या सूचनेनुसार तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने विशेष पथक तयार केले.

या पथकाने पंढरपूर शहर व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून तसेच मोबाईल टॉवरचे तांत्रिक विश्लेषण करून संशयित आरोपीचा माग काढला. तपासातून इसम सुनिलकुमार रामसिंग राजपूत (वय २६ वर्षे, रा. बिकापुरी, पोस्ट हिरापुरा, भिंड, मध्य प्रदेश; सध्या रा. आढेगाव, ता. माढा, जि. सोलापूर) याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी आरोपीला दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी अटक करून विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याच्याकडून घरफोडीत चोरीस गेलेले १२.५० तोळे सोन्याचे दागिने व ३० भार चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १७ लाख १ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढगे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, सपोफो सुजित उबाळे, पोहेकॉ सचिन हेवाडे, अनिल बनसोडे, अस्लम काझी, गणेश पवार, तसेच पोको हर्षद ठक्कर, शहाजी मंडले, सांवत आणि सायबर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथील पोको प्रवीण मेटकरी यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

पंढरपूर शहर पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे घरफोडीचा गुन्हा उघडकीस येऊन मोठ्या प्रमाणात चोरीचा मुद्देमाल हस्तगत झाला आहे.

# माथेरानच्या प्रश्नांसाठी आता नागरिकांनी रस्त्यावर उतरण्याची गरज

## राजकारणाचा चष्मा बाजूला ठेवून जन आंदोलन उभारले तरच प्रश्न मार्गी लागणार!





**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२८, माथेरान :** माथेरानच्या भवितव्याचा प्रश्न आता केवळ राजकारणावर किंवा नगरपालिकेच्या बैठका-ठरावांवर सोडून चालणार नाही. पाणी, वीज, वाढीव वीजबिले, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पर्यायी रस्ते, आरोग्य सुविधा, रिक्षा आणि मोबाईल नेटवर्क अशा अनेक मूलभूत प्रश्नांनी माथेरानकर त्रस्त असताना आता नागरिकांनी राजकारण बाजूला ठेवून एकजुटीने रस्त्यावर उतरण्याची गरज निर्माण झाली आहे.

माथेरानमधील स्थानिक अंतर्गत रस्त्यांची अनेक ठिकाणी अक्षरशः चाळण झाली आहे. पावसाळ्यात लाल मातीचे रस्ते खचून मोठमोठे खड्डे पडले असून नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच पर्यटकांना या रस्त्यांवरून चालणेही कठीण झाले आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता लाल माती, दगड किंवा आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यास तसेच काही ठिकाणी खोदकाम करण्यास परवानग्यांचा प्रश्न निर्माण होत असल्याने कामे रखडतात.

माथेरान हे. पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र असल्यामुळे वनक्षेत्रातील रस्ते किंवा विकासकामांना वन विभागासह संबंधित शासकीय यंत्रणांच्या परवानग्या आवश्यक असतात. त्यामुळे वन विभाग, महसूल विभाग, खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य शासनाच्या संबंधित विभागांमध्ये समन्वय होणे गरजेचे आहे. मात्र परवानगी मिळेपर्यंत नागरिकांनी या खड्डेमय रस्त्यांवरूनच चालत राहायचे का? हा प्रश्न आता प्रशासनाला विचारण्याची वेळ आली आहे. माथेरानच्या अंतर्गत रस्त्यांसाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या दगड-मातीच्या वापराबाबतही पूर्वी वन विभाग, खनिकर्म विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या समन्वयाची गरज व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे पर्यावरणाचे नियम पाळून स्थानिक रस्त्यांच्या देखभालीसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर धोंदाणी-माथेरान, रामबाग-माथेरान तसेच माधवजी पॉईंट परिसरातून भिवपुरीकडे जाणाऱ्या रोपवेचा पर्याय यांसारख्या पर्यायी मार्गांचा प्रश्नही केवळ चर्चेत न राहता शासनाच्या संबंधित विभागांकडे ठोस प्रस्तावाच्या स्वरूपात नेणे आवश्यक आहे.

वनक्षेत्रातून जाणाऱ्या नवीन रस्त्यांना वन विभागाची तसेच आवश्यकतेनुसार केंद्र शासनाच्या वनविषयक मंजुरीची आवश्यकता लागू शकते. माथेरानच्या रस्त्यांच्या बाबतीत अशा मंजुरीची प्रक्रिया यापूर्वीही झालेली आहे. म्हणून पर्यायी रस्त्यांचा प्रश्न हा केवळ नगरपालिकेचा विषय नसून नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, महसूल विभाग, पर्यटन विभाग आणि राज्य शासन यांच्या समन्वयातून मार्गी लावण्याची आवश्यकता आहे. पाण्याचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. नेरळ येथील उल्हास नदी परिसरातून माथेरानला पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेतील जुने पंप भविष्यातील गरजा लक्षात घेऊन बदलणे आवश्यक आहे. यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असल्याने आमदार, खासदार, पालकमंत्री, मंत्रालय आणि संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

वीजपुरवठा, वाढीव वीजबिले, पर्यायी रस्ता, आरोग्य सुविधा, रिक्षा आणि मोबाईल नेटवर्क हे प्रश्नही केवळ नगरपालिका पातळीवर सोडवणे शक्य नाही. त्यामुळे विद्यमान नगराध्यक्ष व नगरसेवकांनी केवळ ठराव मंजूर करून फाईल बंद न करता त्या ठरावाचे रूपांतर निधी मंजुरी, प्रशासकीय मान्यता आणि प्रत्यक्ष कामात होईपर्यंत पाठपुरावा करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

**प्रश्न कोणाचा? हा प्रश्न नको; प्रश्न माथेरानचा आहे, ही भूमिका हवी**

एखादा नागरिक, सामाजिक कार्यकर्ता किंवा संघटना एखादा प्रश्न घेऊन आंदोलन करत असेल तर त्या आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून पाहण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. आंदोलनाचे नेतृत्व कोण करत आहे, तो कोणत्या पक्षाचा आहे किंवा कोणत्या समाजाचा आहे, यापेक्षा तो प्रश्न माथेरानच्या हिताचा आहे का? हे महत्त्वाचे आहे.

आज एखाद्या व्यक्तीने पाणी, रस्ता किंवा अन्य प्रश्नासाठी आवाज उठवला आणि बाकीचे नागरिक शांत राहिले, तर उद्या त्याच समस्येची झळ प्रत्येक माथेरानकराला बसणार आहे. त्यामुळे माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक, विद्यमान नगरसेवक, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, व्यापारी, पर्यटन व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

बैठका होतील, ठराव होतील, आश्वासने मिळतील आणि पाच वर्षे निघून जातील; पण प्रश्न कायम राहणार असतील तर त्याचा उपयोग काय?

म्हणूनच आता माथेरानकरांनी शांत बसण्याऐवजी लोकशाही मार्गाने, शांततामय आणि संघटित जनआंदोलन उभारून शासनाचे लक्ष वेधण्याची वेळ आली आहे. पर्यावरणाचे नियम पाळणे आवश्यकच आहे; मात्र त्याचबरोबर नागरिकांच्या सुरक्षिततेची आणि मूलभूत सुविधांची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे. परवानगीच्या प्रक्रियेला कितीही वेळ लागला तरी तोपर्यंत नागरिकांना खड्ड्यांमध्ये चालण्याची शिक्षा देता येणार नाही. संबंधित विभागांनी तातडीची दुरुस्ती, सुरक्षितता आणि दीर्घकालीन कायमस्वरूपी उपाय यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

माथेरानचा प्रश्न कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा नाहीतो प्रत्येक माथेरानकरांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे आता नेतृत्व कोणाचे यापेक्षा माथेरानसाठी एकत्र कोण उभे राहणार, हा खरा प्रश्न आहे.

# रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून HPV लसीकरणाचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नमुंमपा कार्यक्षेत्रात १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींसाठी HPV लसीकरण कार्यक्रम दि. १०/३/२०२६ पासून राबविण्यात येत आहे.

HPV लसीकरणाचे काम वाढविण्यासाठी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून व क्षत लसीकरणामुळे लाभार्थींचे जीवघेण्या आजारापासून होणारे संरक्षण विचारात घेऊन दि. २७ ऑगस्ट, २०२६ रोजी HPV विशेष लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर विशेष HPV लसीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने : ANM व आशा कार्यकर्ती यांनी कार्यक्षेत्रात गृहभेटी देऊन मोहिमेबद्दल माहिती दिली. ना.प्रा.आ.केंद्र बाह्य रुग्ण विभाग तसेच नियमित लसीकरण सत्रामध्ये मोहिमेची व्यापक प्रसिद्धी करण्यात आली.

यामध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची जीवघेणी व्याप्ती पालकांच्या निदर्शनास आणून दिली. यानुसार HPV लसीकरण सत्राचे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजन करण्यात आले. याव्यतिरिक्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालये येथे दैनंदिन HPV लसीकरण सत्र सुरू असून क्षत लस मोफत उपलब्ध आहे.



आपल्या १४ वर्षे पूर्ण केलेल्या व १५ वर्षे पूर्ण न केलेल्या वयोगटातील प्रत्येक मुलीला एचपीव्ही लस देऊन गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षित करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# वृक्षाला राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा दृढ संकल्प

## मुख्य अभियंतासह व वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** राखी केवळ एका वृक्षाच्या मनगटावर बांधलेली राखी नसून, मानव आणि निसर्ग यांच्यातील अतूट व जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रतीक आहे. या पवित्र बंधनाच्या साक्षीने निसर्गाचे संरक्षण वृक्षांचे संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हरित व शाश्वत भविष्य घडविण्याचा संकल्प आज आपण करीत आहोत. आज, उद्या आणि सदैव अशा शब्दांत निसर्ग रक्षणाचा संदेश देत पर्यावरणपूरक उपक्रम खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला.

वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेत आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात निसर्गा विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शिवाय मानवी जीवनात वृक्षांचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांनी वृक्षरोपण व वृक्षसंगोपनाची शपथ घेतली.

हा उपक्रम मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या शुभहस्ते पार पडला. कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता सचिन डेगवेकर, कल्याण अधिकारी



आनंद वाघमारे, अधिक्षक अभियंता कमलेश मनेश्वर, संदीप देवगडे, अजय पुंड, प्रदीप आखरे, साखरकर, अमित संगेवार, निलेश मालवे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान बोलताना मुख्य अभियंता विवेक रोकडे यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे जतन करणे तितकेच गरजेचे असल्याचे सांगितले. केवळ कागदावर किंवा कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्षात निसर्गरक्षणासाठी प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांनी निसर्गाशी नाते अधिक घट्ट करण्याचा व परिसर हरित ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपण्यासोबतच भावी पिढीसाठी एक सकारात्मक आणि शाश्वत संदेश देण्यात आला.

## थोडक्यात बातम्या

# परभणीच्या स्टेडियम मैदानावर ३० ऑगस्टला शक्तिप्रदर्शन!

## खासदार संजय जाधव यांच्या आयोजनाने सभेकडे जिल्ह्याचे लक्ष



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२८, परभणी :** परभणी जिल्ह्यातील राजकीय वातावरण आगामी भव्य सभेमुळे चांगलेच तापले असून, रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता परभणी येथील स्टेडियम मैदानावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी, युवा आणि लाडक्या बहिणींची भव्य संवाद सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला परभणी जिल्ह्यातील महिला, शेतकरी आणि युवकांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून सभेची ताकद दाखवावी, असे आवाहन सुरेखा शेवाळे यांनी केले आहे.या भव्य सभेचे आयोजन परभणीचे खासदार संजय जाधव यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. त्यामुळे या सभेकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, सभेसाठी मोठ्या प्रमाणात जनसंपर्क आणि तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.

**लाडक्या बहिणींनी इतिहास घडविणाऱ्या संख्येने यावे**

महिलांना आवाहन करताना सुरेखा शेवाळे म्हणाल्या की, परभणी जिल्ह्यातील प्रत्येक लाडक्या बहिणीने ३० ऑगस्ट रोजी स्टेडियम मैदानावर उपस्थित राहावे. आपल्या प्रश्नांवर, अपेक्षांवर आणि भविष्यासंदर्भातील विषयांवर संवाद साधण्यासाठी ही महत्त्वाची सभा आहे. त्यामुळे महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली ताकद दाखवावी.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर होणार संवाद**

परभणी जिल्ह्यातील शेतकरी विविध अडचणींचा सामना करत आहेत. शेतीमालाला भाव, पीकविमा, सिंचन, कर्ज, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीच्या वाढत्या खर्चासह विविध प्रश्नांवर शेतकरी वर्गामध्ये मोठी चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या संवाद सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**युवकांच्या अपेक्षांकडेही लक्ष**

रोजगार, शिक्षण, कौशल्य विकास, उद्योग आणि रोजगाराच्या नव्या संधी हे युवकांसमोरील महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसोबतच जिल्ह्यातील युवकांचाही या संवाद सभेत मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहे.

**सभेसाठी जोरदार तयारी**

स्टेडियम मैदानावर होणाऱ्या या सभेसाठी आयोजकांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून महिला, शेतकरी आणि युवकांना सभेसाठी आणण्यासाठी नियोजन केले जात असून, कार्यकर्त्यांकडून गावोगावी जनसंपर्क सुरू आहे.३० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्टेडियम मैदानावर होणारी ही सभा केवळ संवादाची नव्हे, तर मोठ्या जनशक्तीच्या उपस्थितीची साक्ष देणारी ठरणार असल्याचा विश्वास सुरेखा शेवाळे यांनी व्यक्त केला.लाडक्या बहिणींनो, शेतकरी बांधवांनो आणि युवकांनो३० ऑगस्टला परभणीच्या स्टेडियम मैदानावर मोठ्या संख्येने उपस्थित राहा आणि ही सभा ऐतिहासिक बनवा, असे आवाहन सुरेखा शेवाळे यांनी केले आहे.

# डिजिटल अरेस्टच्या भीतीला बळी पडू नका; सायबर फसवणुकीसाठी १९३० वर तातडीने संपर्क साधा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, मुंबई :** सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर फसवणूक झाल्यास तातडीने '१९३०' या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'डिजिटल अरेस्ट' या सायबर जनजागृती लघुपटाचे आणि '१९३० महाराष्ट्र सायबर अँथम'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर) संजय शिंत्रे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव उपस्थित होते.

यावेळी लघुपट व १९३० महाराष्ट्र सायबर अँथम मध्ये योगदान देणारे कलाकार आशिष विध्यार्थी, पंकज त्रिपाठी, शरद केळकर, सोनाली बेंद्रे, जावेद जाफरी, गायिका सुनिधी चौहान, अभिषेक बॅनर्जी, मंगेश देसाई, समय रैना आदी कलाकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीनंतरचा 'गोल्डन अवर' अत्यंत महत्त्वाचा असून, या काळात तक्रार नोंदविल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याची किंवा परत मिळविण्याची शक्यता अधिक असते. मात्र नागरिकांकडून तक्रार नोंदविण्यास तीन ते पंधरा दिवसांचा विलंब झाल्यास पैसे अनेक खात्यांमधून वळविले जातात आणि त्यांची रिकव्हरी अत्यंत कठीण होते. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विलंब न करता १९३० वर संपर्क साधणे आवश्यक आहे.

मोबाईल, ऑनलाइन व्यवहार, विविध पेमेंट गेटवे आणि डिजिटल माध्यमे ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. तंत्रज्ञानामुळे जीवन सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर नागरिक सायबर गुन्ह्यांना बळी पडण्याची शक्यताही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांचा मुकाबला करण्यासाठी पोलिस यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासोबतच नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक असल्याचे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

सायबर गुन्हेगारांकडून पार्सलमध्ये ड्रग्ज सापडल्याचे सांगणे, ओटीपी फ्रॉड, बनावट फोन कॉल, पोलीस अथवा सीबीआयच्या नावाने धमकावणे अशा विविध क्लृप्त्यांचा वापर केला जातो. स्क्रीनवर खाकी वर्दीतील व्यक्ती, पोलीस अधिकारी किंवा न्यायाधीशांचे रूप पाहून सामान्य नागरिक घाबरून जातो आणि त्यातून फसवणुकीला बळी पडतो. त्यामुळे अशा कोणत्याही दबावाला किंवा भीतीला बळी न पडण्याचे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय असून कलाकार, अभिनेते आणि गायकांच्या माध्यमातून हा संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.